# प्रेसनोट

दि.२८/०२/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | जामखेड पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)नेताजी शिवाजी भाबड, वय–५० वर्ष, ग्रामसेवक, वर्ग–३, वाघा ग्रामपंचायत, जामखेड, ता.जामखेड, जि.अहमदनगर<br>२)शामराव माणिकराव बारस्कर, वय–५३ वर्ष, धंदा–नोकरी, प्राध्यापक, जामखेड महाविद्यालय, जामखेड, रा.वाघा, पो.नान्नज, ता.जामखेड, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | १५,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचे पत्नीचे नावे मौजे वाघा येथे गट नंबर ११४ मध्ये सुमारे दोन हेक्टर क्षेत्र असून सदर क्षेत्रावर महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक जलसिंचन विहीर खोदण्याकरीता प्रस्ताव तक्रारदार यांनी तयार करुन ग्रामपंचायत वाघा येथे सादर केला होता. सदर विहीर खोदण्याचा प्रस्ताव मंजूर करुन पंचायत समिती जामखेड येथे पाठविण्याकरीता आरोपी लोकसेवक ग्रामसेवक भाबड व खाजगी इसम बारस्कर हे लाच मागणी करत असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयाकडे दि.२२/०२/२०२४ रोजी प्राप्त झाली होती. त्यानुसार दि.२२/२/२०२४ व दि.२३/२/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक क्र.१ नेताजी शिवाजी भाबड व आरोपी खाजगी इसम शामराव माणिकराव बारस्कर या दोघांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष १५,०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम आरोपी लोकसेवक भाबड यांनी खाजगी इसम बारस्कर यांच्याकडे देण्यास सांगितली असता आज दि.२८/२/२०२४ रोजी सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम बारस्कर यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडून लाच स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक भाबड व खाजगी इसम बारस्कर यांचेविरुध्द जामखेड पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर